जा. क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा मान्यता

पोआर,

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- २.२.९४

Sent Sai English Medium
Primary School, Adinathnagar,
Bhosari, Pune-411039

प्रति,

अध्यक्ष,

ईश्वर एज्युकेशन सोसायटी, भोसरी.

---

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासन शालेय शिक्षण विभागाकडील क्र. व्हीएलएस-१०९३/[७१४०]/प्राशि-३ दि. २०/१२/९३ व क्र. व्हीएलएस-१०९३/[७१३२]प्राशि ३ दि. २०/१/९४

वरील विषयाचे संदर्भाधील शासनाकडील संदर्भाधिन पत्रान्वये आपल्या संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या --भोसरी-------------- या ठिकाणावरील खाजगी प्राथमिक शाळेस ~~मराठी~~/इंग्रजी माध्यमातून सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षी परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र ही परवानगी शासनाने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होत असल्यासच शासनाने दिलेली असल्याने खालील अटींची पूर्तता संस्थेकडून होते किंवा कसे याबाबतचा अहवाल आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी[प्राथमिक] जिल्हा परिषद प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. यांचेकडे विनाविलंब सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयाकडे परस्पर सादर करावी. म्हणजे परवानगी देणेबाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयास सादर करता येईल.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदी अधिनियम, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत करावी.

२] संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखादी शाळे [illegible]
काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६] संस्थेने विहीत नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे.

७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहीत मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार, शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०] शाळेमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेले वर्ग व त्यातील विद्यार्थी संख्या कळवावी.

११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संस्था उघडणार नाही असे संस्थेने रु. १०/- च्या स्टँप पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१२] शासनाने ज्या माध्यमातून शाळा काढण्यास परवानगी देण्यात येणार आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संस्था/शाळा उघडणार नाही याची हमी रु. १०/-च्या स्टँप पेपरवर द्यावी.

१३] इंग्रजी माध्यमातून परवानगी द्यावयाच्या शाळांच्या संस्थांनी रु. २५,०००/-[रुपये पंचवीस हजार फक्त] अनामत रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल. तरी त्याबाबतचे प्रथमत: हमीपत्र देण्यात यावे. ही रक्कम परवानगीचे पत्र मिळाल्यानंतर दोन आठवड्यात शासनाकडे जमा करावयाची आहे.

वरील अटींची पूर्तता होत असल्याबाबतची माहिती सर्व कागदपत्रांसह शिक्षणाधिकारी [प्राथ] जि. प. /प्रशासन अधिकारी न. पा. शि. मं यांचेकडे त्वरित सादर करावी म्हणजे पुढील कार्यवाही त्वरित करता येईल.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत-
१. शिक्षणाधिकारी[प्राथ. ]जि. प. पुणे विभाग
२. प्रशासन अधिकारी, न. पा. शि. मं. पुणे विभाग, यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

**कायम विना अनुदान तत्वावर**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/८१९/२०१२.
दिनांक :- २३/११/२०१२

प्रति,

मुख्याध्यापक
संत साई इंग्लिश मेडियम स्कुल,
आदिनाथ नगर, भोसरी, पुणे

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ१) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| संत साई इंग्लिश मेडियम स्कुल, आदिनाथ नगर, भोसरी, पुणे | इंग्रजी | अतिरिक्त | इ. १ली ते ७ वीच्या प्रत्येकी २ ऱ्या व ३ ऱ्या तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).

२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रमांकः-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/११६५/१३
दिनांकः- २ /११/२०१३

विषयः-सन २०१३-१४ या वर्षासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी निर्धारण
**कायम विना अनुदानित**

संदर्भः-१) शासन निर्णय क्रं. पीआरई/७०७८/२३८२/सात, दिः- २८/०८/१९८०.
२) शासन निर्णय क्रं. पीआरई/१०९३/२२१/प्राशि-१ दिः- ३०/०१/१९९६.
३) शासन निर्णय क्रं. पीआरई/१०९३/२२१/प्राशि-१ दिः- ०२/०८/१९९६.

**शैक्षणिक संस्थेचे नांव :- ईश्वर एज्युकेशन ट्रस्ट**
**शाळेचे नांव व पत्ता :- संत साई इंग्लिश स्कुल, भोसरी**
**माध्यम :- इंग्रजी**

विद्यार्थी संख्या व तुकडयांची संख्या दर्शविणारा तक्ता क्रं. १.

| शाळेतील विद्यार्थी संख्येबाबतचा तपशील | | इ.१ली | इ.२री | इ.३री | इ.४थी | इ.५वी | इ.६वी | इ.७वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पटसंख्या | १२८ | १२० | १२३ | १३९ | १४७ | १५६ | १३८ | ९५१ |
| २ | सरासरी हजेरी. | ११८ | ११८ | ११९ | १३७ | १४३ | १४९ | १३४ | ९१८ |
| ३ | निकषानुसार मंजूर तुकडया. | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | २१ |
| ४ | अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | अंशतः अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | विना अनुदानित | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | कायम विना अनुदानित | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | २१ |
| एकूण (रखाना ४ ते ७) | | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | २१ |

........ मागे पहा.

### सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात वरील तक्त्यातील विद्यार्थी सरासरी उपस्थितीनुसार मंजूर होणारे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी दर्शविणारा तक्ता क्रं. २.

| मान्य होणाऱ्या पदाची अनुदान प्रकारानुसार वर्गवारी | मान्य होणारे ग्रेडेड मुख्याध्यापक पद | मान्य होणारा पदविधर प्राथमिक शिक्षक | मान्य होणारे उपशिक्षक | एकूण मान्य पदे | शिक्षकेत्तर कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कनिष्ठ लिपिक | शिपाई | एकूण |
| अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अशंतः अनुदानित. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विना अनुदानित | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| कायम विना अनुदानित. | १ | ३ | २० | २४ | ० | ० | ० |
| एकूण | १ | ३ | २० | २४ | ० | ० | ० |

**सुचनाः-**

१) आपल्या शाळेसाठी वर नमुद केल्याप्रमाणे सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता पटसंख्या व उपस्थिती विचारात घेता शिक्षक :२४ व शिक्षकेत्तर कर्मचारी :० एकूण संख्या २४ मंजूर केली असून, यापुढे यावर्षी अगर त्यापुढील कोणत्याही वर्षी जादा शिक्षकांस मंजूरी दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) पुढील अगर त्यानंतरच्या एखाद्या वर्षी इ.२री ते ७ वी पर्यंतच्या एखाद्या वर्गास नैसर्गिक वाढीमुळे जादा तुकडीची आवश्यकता भासत असेल, तर इ. १ ली अगर अन्य वर्गाच्या मंजूर तुकडयातील तुकडी कमी करुन शाळाअंतर्गत समायोजनाने संबंधित वर्गास तुकडी उपलब्ध करुन देता येईल. त्याबाबतचा आवश्यक तसा प्रस्ताव मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांना सादर करुन त्यास मान्यता घ्यावी.

३) १.५ कि. मी. अंतरात अन्य कोणत्याही प्राथमिक शाळा (जि.प. अगर खाजगी ) नसेल तर मात्र पटसंख्या वाढीमुळे जादा तुकडी आवश्यक असेल तर प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ (प्राथमिक) यांचेमार्फत मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करता येईल. तथापी पुर्व मंजूरीशिवाय कोणत्याही परिस्थितीत नवीन तुकडी सुरु करु नये. तसेच त्यावर शिक्षकांची नेमणूक करु नये.

४) शाळेने आपल्या अधिकारात इ. १ ली च्या प्रत्येक तुकडीमध्ये ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. मा. प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ यांच्या पुर्व मंजूरीने ही संख्या ६० पर्यंत वाढविता येईल.

५) वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा अनुदान कपात अगर शाळेची मान्यता काढून घेणे, अशी कारवाई खात्याकडून केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

प्रतिः-

अध्यक्ष/सचिव
ईश्वर एज्युकेशन ट्रस्ट

प्रत : अधिक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक (प्राथमिक) जि.प. पुणे.-०१. यांना माहितीसाठी.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
Government of Maharashtra
Minorities Development Department

No.MEI-2018/CR- 53 /Desk-5
अल्पसंख्याक विकास विभाग, मादाम कामा रोड
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-४०००३२
Minorities Development Department,
Goverment of Maharashtra ,Mantralaya,
Mumbai-४०००३२
Date :**30/11/2018**

ON CONSIDERATION OF THE DOCUMENTARY EVIDENCE PRODUCED BEFORE THE COMPETENT AUTHORITY AND JOINT SECRETARY, THE COMPETENT AUTHORITY AND JOINT SECRETARY IS SATISFIED THAT THE FOLLOWING EDUCATIONAL INSTITUTION/S MANAGED BY **Trust** NAMED **Ishwar Education Trust**, Taluka- **Haveli**, District-**Pune** IS/ARE **Kannada /Linguistic** MINORITY EDUCATIONAL INSTITUTION WITHIN THE MEANING OF SECTION 2 (g) OF THE NATIONAL COMMISSION FOR MINORITY EDUCATIONAL INSTITUTIONS ACT 2004.

| SCHOOLS | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Name of School | Address | District | Taluka | UDISE No |
| 1 | SANT SAI ENGLISH MEDIUM SCHOOL | ADINATHNAGAR, GAVHANE VASTI, BHOSARI, PUNE-411 039 | Pune | Haveli | 27252001003 |
| 2 | SANT SAI HIGH SCHOOL | ADINATHNAGAR, GAVHANE VASTI, BHOSARI, PUNE-411 039 | Pune | Haveli | 27252001004 |

CONSEQUENTLY, IT IS HEREBY DECLARED THAT THE AFORESAID EDUCATIONAL INSTITUTION/S IS/ARE A MINORITY EDUCATIONAL INSITUTION/S COVERED UNDER ARTICLE 30 OF THE CONSITUTION OF INDIA.
IT WILL BE MANDATORY FOR THE CONCERNED EDUCATIONAL INSTITUTION TO INVARIABLY FULFILL ALL THE CRITERIA AND CONDITIONS PRESCRIBED VIDE GOVERNMENT RESOLUTION, MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, NO ASS 2012/CR-21/D-5, DATED 27TH MAY 2013, AND AS AMENDED FROM TIME TO TIME.
THIS MINORITY STATUS CERIFICATE IS APPLICABLE WITHIN THE STATE OF MAHARASHTRA ONLY.
GIVEN UNDER MY HAND WITH THE DIGITAL SIGNATURE AND SEAL OF THE GOVERNMENT OF MAHARASHTRA ON THIS.

Signature valid
Digitally Signed By Sandesh Chhabu Tadvi
(Government Of Maharashtra)
Date : 30-Nov-2018 16:16:55 IST

Minorities Development Dept. ★ Government of Maharashtra ★

(S.C.TADVI)
Joint Secretary & Competent Authority,
Government of Maharashtra.